नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २२/०५/२०२६ (शुक्रवार )

---

# नागपुर ग्रामीण जिल्हयात अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूध्द केलल्या कारवाई बाबत...

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात दिनांक १४/०५/२०२६ ते दिनांक १८/०५/२०२६ दरम्यान नागपुर ग्रामीण पोलीसांनी अवैधरित्या परवान्यापेक्षा जास्त रेती वाहतुक करून शासनाचा महसुल बुडवुण अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या ३० वाहनांवर कारवाई केली.

**अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या ३० पैकी ९ वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त रेती भरलेली होती आणि २१ वाहनांमध्ये परवान्यापेक्षा जास्त रेती भरलेली होती. नमुद २१ वाहनासंदर्भात चालक/मालक यांच्यावर रेती चोरीचे गुन्हे नोंद करण्यात आले. त्यापैकी २५ चालक/मालक आरोपी यांच्यावर यापुर्वी सुध्दा रेती चोरीचे गुन्हे नोंद आहेत. ज्या आरोपींवर रेती चोरीचे २ किंवा त्यापेक्षा जास्त गुन्हे नोंद आहे त्या आरोपींवर हद्दपार आणि एम.पी.डी.ए. अशी काठोर प्रतिबंधक कारवाई प्रस्तावित आहे. ज्या ९ वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त रेती (ओव्हरलोड) भरलेली होती. त्यावर प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) यांच्या मार्फत दंड वसुलीची प्रक्रीया सुरू केलेली आहे. ज्या वाहनांवर अवैध रेती चोरीचे गुन्हे नोंद झालेले आहे त्या वाहनांबाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी (DMO) यांना संबधीत वाहनांचा रेती वाहतुकीचा परवाना रद्द करण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.**

# पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत दाखल सदोष मनुष्यवध (हिट ॲड रन) प्रकरणातील सर्व तिन्ही आरोपी अटक

**पोलीस स्टेशन रामटेक :—** दिनांक २१/०५/२०२६ रोजी मध्यरात्री मौजा तिडके कॉलेज समोर तुमसर ते रामटेक रोड येथे झायलो कार क्र. एम.एच. १४ डी. एन. २६३२ चा चालकाने आणि त्याच्या साथीदाराने त्यांच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन सर्विस रोडवरील सलुन दुकानाचे ठेल्याला जोरात धडक दिली. या वाहनाच्या धडकेने सलुन ठेल्याजवळ असलेला वेडसर अनोळखी ईसमाचा जागीच मृत्यु झाला. नमुद अपघातानंतर आरोपी चालक आणि त्याचे साथीदार वाहन सोडुन पळुन गेले. पोलीसांनी घटनास्थळी पोहचुन वाहनाची तपासणी केली असता वाहनात ६ गोवंश जनावरे जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निर्दयीपणे कत्तलीकरीता जनावांराची वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. नमुद प्रकरणी दिनांक २१/०५/२०२६ रोजी झायलो कार क्र. एम.एच. १४ डी. एन. २६३२ चा चालक आणि त्याचे साथीदार आरोपी यांच्याविरूध्द कलम १०५, १०६(१), २८१, ३(५) भा.न्या.सं सहकलम ११(१) (डी) प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम सह कलम ५ ए (१), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, सह कलम १३४, १८७, १८४ मो.वा.का. अन्वये **सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

**सदर प्रकरणाचे गांभिर्य लक्षात घेता मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी तात्काळ नमुद आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले. रामटेक पोलीसांसह स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांनी सदर गुन्ह्याचा समांतर तपास करीत तपासादरम्यान मिळालेल्या गोपनिय माहीती आणि तांत्रिक पुराव्यावरून दिनांक २२/०५/२०२६ रोजी अवघ्या १२ तासाच्या आत नमुद गुन्हयातील ३ आरोपींना नागपुर शहर येथुन ताब्यात घेतले. नमुद आरोपींना अटक केली आहे. नमुद आरोपींना दिनांक २५/०५/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.**

# गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ११ जनावरांची सुटका, मौदा पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन मौदा :— दिनांक २२/०५/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भंडारा ते नागपूर रोडने अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी बोरगाव चेकपोस्ट येथे भंडारा ते नागपूर रोडवर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान बोलेरो पिकअप क्र. एम एच ४० सी डी १३७५ मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता १) **चालक नामे शुभम अनिल आंबेडारे, वय २३ वर्ष, रा. भिल्लेवाडा, ता. जि. भंडारा २) अश्पाक सज्जाद खान, वय २९ वर्ष, रा. चंगेरा ता. जि. गोंदीया हे मिळुन आले**. पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ११ गोवंशीय जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निर्दयीपणे कत्तलीकरीता जनावरांची वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक बोलेरो पिकअप क्र. एम एच ४० सी डी १३७५ किंमती ६,००,०००/—रूपये आणि ११ गोवंश जनावरे किंमती १,१०,०००/—रूपये असा एकुण ७,१०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपी आरोपींविरूद्ध कलम ११(१) (ड) (ई) (फ) प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम सहकलम ५ (अ) (१), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०३ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक २१/०५/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन पारशिवनी** अंतर्गत आरोपी १) ज्ञानेश्वर ग्यानीराम ऊईके, वय २३ वर्षे, रा. रामाडोंगरी, ता. सावनेर, जि. नागपुर हा मौजा तहसील कार्यालय पारशिवनी समोरील सावनेर ते पारशिवनी रोडवरील प्रवासी निवारा येथे तसेच आरोपी क्र. २) अमन हमीद शेख, वय २३ वर्षे, रा. खारी ,पारशिवनी, ता. पारशिवनी, जि. नागपुर हा मौजा तिन मंदीर रोड पारशिवनी येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन बेला** अंतर्गत मौजा बेला टाउन येथे आरोपी अशोक बाजीराव कन्नाके, वय ६० वर्ष, रा. वार्ड क्र. ०१, बेला ता.उमरेड, जि. नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०३ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक २०/०५/२०२६ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा कपीलेश्वर मंदीराजवळ, स्मशान घाट , केळवद येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे केळवद पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) फरीयाद ईसाईल शेख, वय ३५ वर्ष, रा. वार्ड नं ०१, केळवद ०२) विनोद संजय बावणकर, रा. केळवद** यांना जागीच पकडले.एक आरोपी पोलीसांना पाहुन पळुन गेला.

**पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम २००/—रूपये, ०१ ॲडरॉईड मोबाईल किंमती १५,०००/—रूपये असा एकुण १५,२००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन केळवद येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ११ गुन्हे नोंद

दिनांक २१/०५/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ७४००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे केशव बारसु दिघोरे, वय ६० वर्ष, रा .वार्ड क्र. ०१, बुधवारपेठ उमरेड याचे वर १ गुन्हा नोंद, तसेच आरोपी क्र. २) मनोज शंकर नागपुरे, वय ३६ वर्ष, रा. ब्राम्हणी, ता. उमरेड याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे बादल रामभाउ रार्घोते, वय २५ वर्ष, रा. लहान सिल्ली, ता. कुही मज नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १) किशोर रामदास काळबांडे, वय ३० वर्ष, रा. करंजोली, ता. नरखेड २) साहेबराव विठोबा मोरे वय ५६ वर्ष रा. थूगावदेव ता. नरखेड याचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी क्र. १) नामे राजू रामकृष्ण वरकाडे, वय ५९ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१, तुमडी ता. जि. नागपूर २) प्रताप बिजाराम वाढवे, वय ३९ वर्ष, रा. बोथली पादरी टाणा, जि. नागपूर ३) कमलाकर शंकर परतेकी, वय ३२ वर्ष, रा. सातगाव रिधोरा, ता. हिंगणा, जि. नागपुर ४) बंडू गजानन डोंगरे, वय ३४ वर्ष, रा. धनज खुर्द, ता. कारंजा, जि. वाशिम, ह.मू आर्यन धाबा वर्धा रोड, ता. हिंगणा, जि. नागपूर याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे अभिनाथ जगन्नाथ डोंगरे, वय ६० वर्ष, रा. सिंदेवानी, ता. सावनेर, जि. नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद,

**नमुद कारवाईत एकुण १) ३५ लिटर मोहाफुल गावठी दारू २) ७५६० मिली देशी दारू असा एकुण ७४००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने